# दृष्टिकोन

आजी म्हणते, "आज कुडुकुडू
थंडी फारच वाजते बाई".
गप्प राहिलो, मला तरीही
ऐकू कसं येतच नाही?

आजी म्हणते,"वारा पडला"
मी शोधला घरभर त्याला.
पडल्यावर मी रडतो ना?
वारा मुळीच नाही रडला.

आजी निवडत होती तेव्हा
तांदूळ एक चालू लागला!
मी खेळलो असतो तरी
"कीऽऽड" म्हणत तिने उचलला.

शाळेत फक्त इंग्लिश बोलतात!
इंग्लिश नावं वेगळीच असतात!
मांजराला `cat', कुत्र्याला ‘dog'
अन् ‘निखिल’ला ना, ‘जोशी’ म्हणतात!

-उज्ज्वला दळवी.